## नियमित दिवाणी अपील क्र. १६४/२०१८

### निशाणी १९ वरील आदेश

अपीलकाराने प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. ६ चे वारस दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. ६ अपीलाचे कामकाज सुरु असताना मुंबई येथे दि. ०५/०१/२०१९ रोजी दिवंगत झाली. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार तिच्या मृत्युची कल्पना लागलीच न आल्याने तसेच वारसांची नावे वेळेत उपलब्ध न झाल्याने ९० दिवसांच्या कालावधीत वारस अभिलेखावर आणता आलेले नाहीत. वारस अभिलेखावर आणण्याकरीता ४ महिने २३ दिवसांचा विलंब झाला, तसेच अपीलाचे काम उत्तरवादी क्र. ६ हिचे विरुध्द रद्द करण्यात आले.

०२. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी न मिळाल्यास अपीलकार याच्यावर घोर अन्याय होणार आहे, तसेच त्याचे कधीही व केंव्हाही पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब उत्तरवादी क्र. ६ हिचे विरुध्द अपील रद्द होण्याचा झालेला आदेश रद्द करावा.

०३. उत्तरवादीतर्फे अर्जाच्याकामी म्हणणे देण्यात आलेले असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अपील मालवण येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ५९/२०११ चे कामी पारीत केलेल्या न्यायनिर्णय व हुकुमनाम्याविरुध्द केलेले आहे. मुळ न्यायालयात अपीलकाराविरुध्द त्याने गोळवण ग्रामपंचायत घर क्र. १०८ व्यतिरिक्त उर्वरीत भागातील वादींच्या सामाईक कब्जे

वहिवाटीस हरकत अडथळा न करण्याविषयी कायमची ताकीद देण्यात आलेली आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार त्याला देण्यात आलेली ताकीद योग्य नाही व त्यामुळे त्याने जिल्हा न्यायालयात या अपिलाद्वारे दाद मागितलेली आहे.

०५. उत्तरवादी क्र. ६ पूर्वाश्रमीची वादी क्र. ६ असून कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तिला दावा मिळकती संदर्भाने कायदेशीर हक्क मिळालेले आहेत. अपीलकाराने या हक्कांना आव्हानीत केलेले असल्यामुळे उत्तरवादी क्र. ६ हिच्याविरुध्द दाद मागणे अपीलकारास आवश्यक आहे. उत्तरवादी क्र. ६ अपील प्रलंबित असताना मयत झालेली आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये तिच्या वारसांना तिचे हक्क प्राप्त झालेले असून अपीलकारास त्यांच्याविरुध्द दाद मागणे आवश्यक आहे.

०६. उत्तरवादी क्र. ६ चे वारस मुदतीत अभिलेखावर न आणल्याने अपील तिच्याविरुध्द रद्द करण्यात आले आहे. मुदतीत वारस न आणल्याने अपील रद्द करण्याचा आदेश रद्द न झाल्यास अपीलकाराचे नुकसान होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. न्यायाचेकारणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली करणेत येत आहे.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2020.01.08 16:07:43 +05'30'

ठिकाण: ओरोस. (वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश १
दिनांक: ०८/०१/२०२०. **सिंधुदुर्ग—ओरोस.**

नियमित दिवाणी अपील क्र. १६४/२०१८

## निशाणी २० वरील आदेश

अपीलकाराने प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. ६ चे वारस दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. ६ अपीलाचे कामकाज सुरु असताना मुंबई येथे दि. ०५/०१/२०१९ रोजी दिवंगत झाली. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार तिच्या मृत्युची कल्पना लागलीच न आल्याने तसेच वारसांची नावे वेळेत उपलब्ध न झाल्याने ९० दिवसांच्या कालावधीत वारस अभिलेखावर आणता आलेले नाहीत. वारस अभिलेखावर आणण्याकरीता ४ महिने २३ दिवसांचा विलंब झाला आहे.

०२. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी न मिळाल्यास अपीलकार याच्यावर घोर अन्याय होणार आहे, तसेच त्याचे कधीही व केंव्हाही पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर दाखल करण्यास झालेला विलंब माफ करावा.

०३. उत्तरवादीतर्फे अर्जाच्याकामी म्हणणे देण्यात आलेले असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अपील मालवण येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ५९/२०११ चे कामी पारीत केलेल्या न्यायनिर्णय व हुकुमनाम्याविरुध्द केलेले आहे. मुळ न्यायालयात अपीलकाराविरुध्द त्याने गोळवण ग्रामपंचायत घर क्र. १०८ व्यतिरिक्त उर्वरीत भागातील वादींच्या सामाईक कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा न करण्याविषयी कायमची ताकीद देण्यात आलेली

आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार त्याला देण्यात आलेली ताकीद योग्य नाही व त्यामुळे त्याने जिल्हा न्यायालयात या अपिलाद्‌वारे दाद मागितलेली आहे.

०५. उत्तरवादी क्र. ६ पूर्वाश्रमीची वादी क्र. ६ असून कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तिला दावा मिळकती संदर्भाने कायदेशीर हक्क मिळालेले आहेत. अपीलकाराने या हक्कांना आव्हानीत केलेले असल्यामुळे उत्तरवादी क्र. ६ हिच्याविरुध्द दाद मागणे अपीलकारास आवश्यक आहे. उत्तरवादी क्र. ६ अपील प्रलंबित असताना मयत झालेली आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये तिच्या वारसांना तिचे हक्क प्राप्त झालेले असून अपीलकारास त्यांच्याविरुध्द दाद मागणे आवश्यक आहे.

०६. उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर आणण्यास विलंब झालेला आहे, परंतु केवळ विलंब झाला म्हणुन तिचे वारस अभिलेखावर आणण्याची संधी अपीलकारास नाकारणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुध्द होणार आहे. अपीलाच्या गुणदोषावरील निर्णयाकरीता उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. न्यायाचेकारणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. येणेप्रमाणे अर्ज निकाली करणेत येत आहे.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2020.01.08 16:08:31 +05'30'

ठिकाण: ओरोस. (वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश १
दिनांक: ०८/०१/२०२०. **सिंधुदुर्ग—ओरोस.**

नियमित दिवाणी अपील क्र. १६४/२०१८

## निशाणी १८ वरील आदेश

अपीलकाराने प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. ६ चे वारस दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. ६ अपीलाचे कामकाज सुरु असताना मुंबई येथे दि. ०५/०१/२०१९ रोजी दिवंगत झाली. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार तिच्या मृत्युची कल्पना लागलीच न आल्याने तसेच वारसांची नावे वेळेत उपलब्ध न झाल्याने ९० दिवसांच्या कालावधीत वारस अभिलेखावर आणता आलेले नाहीत. वारस अभिलेखावर आणण्याकरीता ४ महिने २३ दिवसांचा विलंब झाला आहे. तसेच तिच्याविरुध्द अपील रद्द झालेले आहे.

०२. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी न मिळाल्यास अपीलकार याच्यावर घोर अन्याय होणार आहे, तसेच त्याचे कधीही व केंव्हाही पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब तिचे वारस अभिलेखावर आणण्याची परवानगी मिळावी.

०३. उत्तरवादीतर्फे अर्जाच्याकामी म्हणणे देण्यात आलेले असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अपील मालवण येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ५९/२०११ चे कामी पारीत केलेल्या न्यायनिर्णय व हुकुमनाम्याविरुध्द केलेले आहे. मुळ न्यायालयात अपीलकाराविरुध्द त्याने गोळवण ग्रामपंचायत घर क्र. १०८ व्यतिरिक्त उर्वरीत भागातील वादींच्या सामाईक कब्जे

वहिवाटीस हरकत अडथळा न करण्याविषयी कायमची ताकीद देण्यात आलेली आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार त्याला देण्यात आलेली ताकीद योग्य नाही व त्यामुळे त्याने जिल्हा न्यायालयात या अपिलाद्वारे दाद मागितलेली आहे.

०५. उत्तरवादी क्र. ६ पूर्वाश्रमीची वादी क्र. ६ असून कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तिला दावा मिळकती संदर्भाने कायदेशीर हक्क मिळालेले आहेत. अपीलकाराने या हक्कांना आव्हानीत केलेले असल्यामुळे उत्तरवादी क्र. ६ हिच्याविरुध्द दाद मागणे अपीलकारास आवश्यक आहे. उत्तरवादी क्र. ६ अपील प्रलंबित असताना मयत झालेली आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये तिच्या वारसांना तिचे हक्क प्राप्त झालेले असून अपीलकारास त्यांच्याविरुध्द दाद मागणे आवश्यक आहे.

०६. उत्तरवादी क्र. ६ चे वारस मुदतीत अभिलेखावर न आणल्याने झालेला विलंब आणि तिच्याविरुध्द अपील रद्द करण्याचा झालेला आदेश रद्द केलेला आहे. उत्तरवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर न आणल्याने अपीलकाराचे नुकसान होणार आहे. अपीलाचे काम गुणदोषावर निर्णित होण्याकरीता उत्तरवादी क्र. ६ हिचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. न्यायाचेकारणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकाराने मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त अपील मेमो दाखल करावा.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2020.01.08 16:09:34 +05'30'

ठिकाण: ओरोस.

(वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश १
**सिंधुदुर्ग—ओरोस.**

दिनांक: ०८/०१/२०२०.